पुणे नव राष्ट्र प्लस

पुणे, शुक्रवार, २१ जुलै २०१७ तापमान: २८.१, २२.६ डि.से.

# आयुर्वेदाला तंत्रज्ञानाची जोड हवी

## डॉ. अरुण जामकर यांचे मत

**पुणे :** आयुर्वेद हे भारतीय परंपरेने दिलेले आपले शास्त्र आहे. त्यामध्ये अनेक मोठ्या आजारांनाही बरे करण्याची क्षमता आहे. आयुर्वेदाला तंत्रज्ञान आणि संशोधनाची जोड मिळाल्यास त्यामध्ये सुपरस्पेशालिटी येऊ शकते. केसांवर उपचारपद्धती विकसित करणारे केशायुर्वेद हे त्याचे आदर्श उदाहरण आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. अरुण जामकर यांनी केले.



आरोग्यवर्धिनी चिकीत्सालय आणि बीव्हीजी इंडियातर्फे 'केशायुर्वेद'च्या प्रथम वर्धापनदिनानिमित्त टिळक स्मारक मंदिरात आयोजित 'आयुर्वेदाच्या स्मृतीतून' पुस्तकाचे प्रकाशन व केशायुर्वेदच्या तीस उपकेंद्र प्रमुखांच्या सत्कार सोहळ्यात ते बोलत होते.

यावेळी बीव्हीजी इंडियाचे संचालक दत्ताजी गायकवाड, संचालिका वैशाली गायकवाड, स्वप्नाली गायकवाड, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. सतीश डुंबरे, आयुषच्या संचालिका डॉ. सरिता गायकवाड, केशायुर्वेदचे संचालक वैद्य हरीश पाटणकर, स्नेहल पाटणकर आदी उपस्थित होते.

यावेळी असोसिएशन ऑफ कॉस्मेटॉलॉजी, ट्रायकोलॉजी अँन्ड टेक्नॉलॉजीची स्थापना करण्यात आली.

जामकर म्हणाले की, आयुर्वेदिक उपचारपद्धतीचा अभ्यास करून सुपरस्पेशालिटी मिळविण्याकडे सध्या कल वाढत आहे. परंतु, आयुर्वेदात आणखी मोठ्या प्रमाणात संशोधन होणे गरजेचे आहे. केसांची आयुर्वेदाच्य साहाय्याने निगरानी होणे ही काळाची गरज आहे. आयुर्वेदाची सेवा करणाऱ्यांनी त्यावर श्रद्धा ठेवली पाहिजे. आपण करीत असेलल्या संशोधनाचे दस्त जपले पाहिजेत. त्याला आधुनिकतेची जोड दिली पाहिजे.जोगळेकर म्हणाले, आयुर्वेदामध्ये शास्त्रीय दृष्टिकोनातून संशोधन होत आहे, ही जमेची बाजू आहे. पाश्चात्य देशांमध्ये संशोधनाच्या जोरावर आयुर्वेद सिद्ध केले जात आहे. अशावेळी आपले मूळ शास्त्र असलेले आयुर्वेद जगभर पोहोचले पाहिजे.